ग्रीनलॉन्स विदयालय

इयत्ता – ७ वी-अ,ब,क TERMINAL EXAMINATION मार्क – ८0

दिनांक : २३-०९ -२०२४ विषय – मराठी वेळ-2 ½तास

INSTRUCTIONS- 1. This paper comprises of two sections. Section A and section B.

2. Section ‘A’ answers must be written on the answer sheet.

3. Section ‘B’ answers must be written on the paper itself. And attach

Paper with section A answer sheet .

---

प्रश्न १. खालील दिलेला उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : गुण १०

दादास पत्र

दादा, कालच मी सहलीला जाऊन आले. अरे, इतकी मजा आली, काय सांगू! या महिन्यात विज्ञान केंद्रातर्फे आमच्या शाळेत पक्ष्यांसंबंधीची चित्रफीत दाखवली. ती पाहून आणि तेव्हा ताई-दादांनी सांगितलेली माहिती ऐकून यावर्षी शाळेची सहल एखादया अभयारण्यातच न्यायची, असा हट्ट आम्ही शिक्षकाजवळ धरला.

सहलीच्या दिवशी आम्ही पहाटेच निघालो. सोलापूर-बार्शी मार्गावर बावीस किलोमीटर अंतरावर असलेल्या नान्नज गावाजवळ 'माळढोक अभयारण्य आहे. ठरलेल्या वेळी आम्ही तिथे पोहोचलो. अभयारण्यातून फिरत असताना सर सांगत होते, की ‘भारतातून नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या माळढोक या अत्यंत देखण्या पक्ष्याला वाचवण्यासाठी वनविभागानं हे अभयारण्य घोषित केलेलं आहे. माळढोक पक्षी शेतकऱ्याचा मित्र आहे कारण शेतातील किड्यावर तो गुजराण करतो. हा पक्षी वर्षातून एकदाच अंडी घालत असल्याने त्यांची संख्या कमी आहे. शिवाय इतर प्राण्यानी माळढोक पक्ष्यांची अंडी तुडवली, तर संख्या आणखीनच कमी होते.

दादा, आम्ही हा माळढोक पक्षी अगदी जवळून व निरखून बघितला. काय त्याचा रंग! काय त्याची चोच! इतका देखणा पक्षी मी यापूर्वी कधीही बघितला नव्हता माळढोक पक्ष्यांबरोबरच आम्ही चंडोल, माळटिटवी तसेच इतर पक्षीही पाहिले. आमच्या शिक्षकांनी माळढोक पक्ष्यांचे फोटो कॅमेऱ्यात टिपले . पक्ष्यांचे फोटो काढण्यापूर्वी वनखात्याची पूर्वपरवानगी घ्यावी लागते, , हे आम्हांला नव्यानेच समजले.

पक्षी हा संतुलित पर्यावरणाचा अविभाज्य घटक आहे. प्रदूषण टाळण्यात, बियांचं वहन करण्यात त्यांची प्रमुख भूमिका असते हे आमच्या सरानी सांगितलेलं आम्हांला पटले. आमची सहल अविस्मरणीय झाली. दादा, अभयारण्यातून फिरताना मला तुझी खूप आठवण आली, कारण तुलाही पक्षी खूप आवडतात.

इकडे मी, आई, बाबा मजेत आहोत. तू कसा आहेस? तुझा अभ्यास कसा सुरू आहे? पत्र मिळताच तुझी खुशाली कळव. आम्ही तुझ्या पत्राची वाट बघत आहोत.

कृती १. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : गुण ४

१. माळढोक पक्ष्यांबरोबर मुलांनी आणखी कोणकोणते पक्षी बघितले?

२. 'दादास पत्र' लिहिलेल्या बहिणीचे नाव काय आहे?

३. पक्षांची प्रमुख भूमिका काय आहे?

४. माळढोक अभयारण्य कोठे आहे?

**कृती २. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा: गुण १.**

१. पक्षी हा ---------- पर्यावरणाचा अविभाज्य घटक आहे.

२. पत्र मिळताच तुझी -------- कळव. आम्ही तुझ्या पत्राची वाट बघत आहोत.

**कृती ३. समानार्थी शब्द लिहा : गुण २**

१. भूमिका २. अविस्मरणीय ३. नष्ट ४. अविभाज्य

**कृती ४. खालील इंग्रेजी शब्दांचे अर्थ मराठीत लिहा : गुण १**

( शेती , शेतकरी , पर्यावरण , प्रदूषण )

१. Pollution २. Farmer

**कृती ५. खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा : गुण २**

१. अभयारण्यातून फिरताना सरांनी विद्यार्थ्यांना माळढोक पक्ष्याबद्दल काय सांगितले ?

**प्रश्न २.(अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : ( कोणतेही ५ ) गुण ५**

१. भविष्यात विद्यार्थी कसे होणार आहेत ?

२. 'टप टप पडती' या कवितेत कोणाला खुळे म्हटले आहे?

३. कर्णागड कोठे वसला आहे?

४. 'गोपाळचे शौर्य' या पाठाचे लेखक कोण आहेत?

५. चिमणपाखरे शाळेकडे काय मागत आहेत?

६. 'टप टप पडती' या कवितेचे कवी कोण आहेत?

**प्रश्न २.(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा : गुण ४**

१. गडावरील फेरफटका पूर्ण झाल्यावर प्रत्येकाने आपापले ----------- सादर केले.

( चित्रकला , शिल्पकला , कलागुण )

२. परिसरातील नागरिक गोपाळच्या या ----------- भरभरून कौतुक करत होते.

( शौर्याचे , कार्याचे , कामाचे )

३. दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रातून ही ----------- सर्वच लोकांना कळली.

( गोष्ट , वार्ता , बातमी )

४. ------------- दलाच्या दोन गाड्यांना बोलावून घेतले.

( सैन्यदल , अग्निशामक , नौदल )

**प्रश्न २.(क) . खालील विधाने कोणी कोणास म्हटले ते लिहा : गुण २**

१. "अरे वेड्या , हि जंगलाची आग आपण कशी काय विझवू शकू?"

२. "पण साहेब , हे कसं शक्य आहे?मला तर हा वेडेपणाच वाटतो."

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : (कोणतेही १ ) गुण ५**

१. अभ्यास करण्यासाठी रजा मागणारे ( FOR STUDY LEAVE) पत्र तुम्ही तुमच्या शाळेच्या मुख्याधापिकेला ( TO THE PRINCIPAL ) लिहा.

OR

२. तुमच्या मोठ्या भावाला( TO YOUR ELDER BROTHER) राज्यस्तरीय ( STATE LEVAL) एकपात्री नाटक( ONE ACT PLAY ) स्पर्धेत (COMPETITION) प्रथम क्रमांकाचे पारितोषिक( FIRST PRIZE) मिळाले आहे. त्याबद्दल अभिनंदन( CONGRATULATION LETTER)करणारे पत्र लिहा :

**प्रश्न ४: खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा: गुण ८**

भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 ते मृत्यू 6 डिसेंबर 1976 झाला. हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थामधून अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्राप्त केली. तसेच त्यांनी कायदा, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांवर संशोधन केले. त्याच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत, ते एक अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि वकील होते. त्यानंतर त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम केले.

ते दररोज 14 ते 16 तास अभ्यास करीत असत. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराजांनी त्यांना उच्च शिक्षणासाठी इग्लंडला पाठविले. बाबासाहेब आबेडकरांना पुस्तके वाचण्याची फार आवड होती. असे सांगितले जाते की त्याचे स्वतःचे वैयक्तिक वाचनालय हे जगातील सर्वात मोठे वैयक्तिक वाचनालय होते आणि त्यात पुस्तकांची संख्या 50 हजारापेक्षा देखील अधिक होती.

लंडन येथे वास्तव्याच्या वेळी ते दररोज एका वाचनालयात जात असत आणि तासनतास अभ्यास करीत असत. त्यांना पुस्तके वाचनाची फार आवड होती.

**कृती १. एका वाक्यात उत्तरे लिहा (Answer in one sentence) गुण ५**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्ण नाव काय होते?

२. डॉ. आंबेडकरांचा जन्म कधी झाला?

३. डॉ. आंबेडकरांनी कोणती चळवळ उभारली?

४. सयाजीराव गायकवाड महाराजांनी त्यांना शिक्षणासाठी कोठे पाठविले?

६. आंबेडकरांच्या वैयक्तिक वाचनालयात किती पुस्तके होती?

**कृती २. खालील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा. (Answer in brief) गुण २**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणकोणत्या क्षेत्रात शिक्षण पूर्ण केले?

**कृती ३. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा: गुण १**

१. ते दररोज -------- ते -------- तास अभ्यास करीत असत.

२. त्यांनी कायदा, अर्थशास्त्र आणि ------------ या विषयांवर संशोधन केले.

**प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा : गुण ६**

१. माझी शाळा :

मुद्दे: (माझ्या शाळेचे नाव - शाळेची सुरवात कोणत्या गोष्टीने होते- शाळेत कोणकोणत्या गोष्टी आहेत – शाळेतील मुख्याध्यपिका – शाळेतील शिक्षक – शाळेतील स्पर्धा – शाळेत का जावेसे वाटते – शाळेबद्दल असलेला अभिमान.)

२. मी पक्षी झालो तर ------------

मुद्दे: ( कल्पना कशी सुचली – कोणता पक्षी होणार – पक्षाचं जीवन – मर्यादा – मानवी जीवन आणि पक्षांचे जीवन यांचा संबंध.)

३. माझी आई

मुद्दे : ( आईचे नाव - आईचा स्वभाव – आईचे घरातील स्थान – आईचे शिक्षण – आईचे संवाद साधण्याचे कौशल्य – आईचे कार्य – आईची मेहनत -कर्तव्ये.)

# ग्रीनलॉन्स विदयालय

**इयत्ता – ७ वी-अ,ब,क** **TERMINAL EXAMINATION** **मार्क – ८0**

**दिनांक : २३-०९ -२०२४** **विषय – मराठी** **वेळ-2 ½तास**

**INSTRUCTION. 1.Section 'B' answers must be written on the paper itself. And attach Paper with section A answer sheet.**

---

**प्रश्न १. खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा : गुण ६**

( झुळझुळ, नीतिमंत, अंबरा , मोरपिसारा, फुले, कलागुणी, पाऊस, मोरपिसारा, बुद्धिमंत, वारा, कळस, उंच, लुकलुक)

१. होऊ आम्ही ------------------------------ .

------------------------ ------------------------

कीर्तीचा ---------------------- जाय ------------ ------------- || ३ ||

२. गाणे अमुचे ---------------------- वारा, गाणे अमुचे --------------------- तारा

------------------ , ------------------, ------------------------ या गाण्यातून --------------- !

**प्रश्न २.(अ) खालील दिलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ लिहा : गुण ५**

१. भरभरून कौतुक करणे : ------------------------------------------------------------

२. हतबल होणे : ----------------------------------------------------

३. शौर्य दाखविणे : ------------------------------------------------

४. गुण्यागोविंदाने राहणे : -------------------------------------

५. वणवा लागणे : ------------------------------------------

**प्रश्न २.(ब) खालील दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहा : गुण ४**

( स्वर, भाग, माणूस, हेतू, अतूट, पारिजातक, हंगामी, संवाद )

१. प्राजक्त: ---------------------------- २. संभाषण: -------------------------

३. घटक: ------------------------------ ४. सूर: ------------------------------

५. गृहस्थ: ------------------------------ ६. मोसमी: ------------------------------

७. अविभाज्य: ------------------------------ ८. उद्देश: ------------------------------

**प्रश्न ३.(अ) खालील अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द बदलून वाक्य पुन्हा लिहा: गुण ३**

१. अजय माझा चांगला <u>मित्र</u> आहे.

उत्तर: ------------------------------------------------------------------------

२. माझ्या इमारतीत खूप <u>अंधार</u> आहे.

उत्तर: ------------------------------------------------------------------------

३. मी उद्यापासून चांगल्या कामाला <u>आरंभ</u> करणार आहे.

उत्तर: ------------------------------------------------------------------------

**प्रश्न ३.(ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा: गुण ३**

१. राग X ------------------------------ २. प्रश्न X ------------------------------

३. जुनाट X ------------------------------ ४. प्रगती X ------------------------------

५. पर्वा X ------------------------------ ६.धोकादायक X ------------------------------

**प्रश्न ३.(क) खालील शब्दांचे लिंग बदला गुण ३**

१.कवी : ------------------------------ २. देखणा : ------------------------------

३. कन्या : ------------------------------ ४. पंडित : ------------------------------

५. पाहुणा : ------------------------------ ६. आंधळा : ------------------------------

**प्रश्न ३.(ड) खालील शब्दांचे वचन बदला : गुण ३**

१. शेतकरी : ------------------------------ २. दिवस : ------------------------------

३. मंदिर : ------------------------------ ४. नद्या : ------------------------------

५. दवाखाने : ------------------------------ ६.ठिकाण : ------------------------------

**प्रश्न ४.(अ) खालील वाक्यातील नाम व प्रकार ओळखा : गुण ३**

१. आम्ही माळढोक पक्षी बघितला.

उत्तर: नाम : ------------------------- प्रकार : ----------------------------

2. ताई सुबक विणकाम करते .

उत्तर: नाम : ------------------------- प्रकार: ----------------------------

3. आजीला त्याचे दु:ख झाले.

उत्तर: नाम : ------------------------- प्रकार: ----------------------------

**प्रश्न ४.(ब) खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा : गुण २**

१. माळढोक आम्हाला आवडतो.

उत्तर: सर्वनाम : ----------------------

२. ते पुस्तक तिने वाचले आहे.

उत्तर : सर्वनाम : ----------------------

**प्रश्न ४.(क) खालील वाक्यातील विशेषण ओळखून प्रकार लिहा: गुण ३**

१. आईने मला शंभरदा बजावले.

उत्तर: विशेषण : ---------------------------- प्रकार: --------------------------

२. तो लांबचलांब व जाडजूड पाईप गोपाळने ओढत आणला.

उत्तर: विशेषण :---------------------------- प्रकार: --------------------------

३. माळढोक पक्षी सुंदर पक्षी आहे.

उत्तर: विशेषण : ---------------------------- प्रकार: --------------------------

**प्रश्न ४.(ड) शब्दापासून वाक्ये तयार करा: Make meaningful sentences) गुण ५**

१. आनंद (Pleasure) : ------------------------------------------------------------------------------------------------

२. धाडस (Dare) : ------------------------------------------------------------------------------------------------------

३. प्रदूषण (Pollution) : ---------------------------------------------------------------------------------------------

४. पाऊस ( The Rain): ----------------------------------------------------------------------------------------------

५. प्रार्थना ( Prayer) : ------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------